# छत्रपती शाहू महाराज यांनी भटक्या विमुक्त समुदायासाठी केलेल्या कार्याचे समाजशास्त्रीय अध्ययन

**अमोल महापुरे, रिसर्च स्कॉलर,** समाजशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर.

---

**प्रस्तावना:-**

छत्रपती शाहू महाराज हे भारतीय समाजाला पडलेले सुंदर स्वप्न होते. छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या संपूर्ण आयुष्यामध्ये आपल्या राज्यातील वंचित, उपेक्षित जनता विकासाच्या मूळ प्रवाहात यावी, त्यांचे कल्याण व्हावे हे सुंदर असे ध्येय ठेवून शाहू महाराजांनी आपला संपूर्ण राज्यकारभार केला. केवळ राजवाड्यात न राहता इथल्या गोरगरीब समाजात जाऊन त्यांची दुःख जाणून घेऊन त्यावरती उपाय करण्याचा प्रयत्न केला. शिक्षण, आरोग्य, अस्पृश्यता, राजकारण, कृषी, सांस्कृतिक, क्रीडा या सर्व क्षेत्रांमध्ये शाहू महाराजांनी केलेले कार्य हे अद्वितीय स्वरूपाचे आहे. सध्यकालीन राजकीय व्यवस्थेमध्ये केले जाणारे कायदे हे शाहू महाराजांनी सुमारे १०० वर्षांपूर्वी आपल्या राज्यांमध्ये केलेली होते. आरक्षणाचा कायदा, प्राथमिक शिक्षण सक्तीचा कायदा, अस्पृश्यता निवारण इत्यादी अनेक कायदे शाहू महाराजांनी त्याकाळी केलेले होते. यावरून शाहू महाराज किती दूरदृष्टीचे नेते होते राजे होते, हे कळून येते. स्वातंत्र्य, न्याय, समता ही तत्वे घेऊन त्यांनी आपला राज्यकारभार केलेला आहे.

शाहू महाराजांनी भटक्या विमुक्त समुदायासाठी केलेले काम हे अजोड स्वरूपाचे आहे. शाहू महाराजांचे शैक्षणिक गुरू फेरीस यांनी त्यांचे कार्य पाहून भारतातून परतताना निरोपाच्या भाषणात काढलेले गौरवोद्गार म्हणजे एका तटस्थ निरीक्षणाआधारे वंचितांप्रती शाहू महाराजांच्या दया बुद्धीची प्रशस्तीच म्हणावी लागेल. निरोपाच्या प्रसंगी फेरीस म्हणाले होते की, आपल्या प्रजेचे परिस्थिती सुधारावी यासाठी एक ही संधी वाया न घालवणाऱ्या पैकी छत्रपती शाहूराजे एक आहेत. माझा असा विश्वास आहे की, वरिष्ठांची प्रगती रोखावी म्हणून नव्हे तर, गरिबांचा दर्जा उंचवावा यासाठी महाराजांचे प्रयत्न आहेत. आपल्या प्रजेपैकी जे मागास समाज आहेत. त्यांची प्रगती करण्यासाठी अहोरात्र झटत आहेत. यातून शाहू महाराज हे वंचितांचे वाली आहेत हे स्पष्ट होते.प्रस्तुत शोधनिबंधामध्ये संशोधकाने शाहू महाराजांनी भटक्या विमुक्त समुदायाविषयी केलेल्या अजोड कार्याचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:-**

१) छत्रपती शाहू महाराजांनी भटक्या विमुक्त समुदायासाठी केलेल्या कार्याचा आढावा घेणे

२) कोल्हापूर संस्थानातील तत्कालीन भटक्या विमुक्त समुदायाचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहीतके:-**

१) छत्रपती शाहू महाराजांनी भटक्या विमुक्त समुदायासाठी केलेले कार्य हे अद्वितीय स्वरूपाचे आहे.

२) तत्कालीन कोल्हापूर संस्थान हे भटक्या मुक्त समुदायासाठी नंदनवन होते.

**अभ्यास पद्धती :-**

प्रस्तुत शोधनिबंधाकरिता वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग केलेला आहे.

**तथ्य संकलन :-**

प्रस्तुत शोधनिबंध करिता दुय्यम माहीती स्त्रोतांचा वापर केलेला आहे. यामध्ये ग्रंथ, मासिके, शाहू महाराजांच्या वरील पुस्तके, इंटरनेट यांचा समावेश आहे.

**१८७१ चा गुन्हेगारी जमात कायदा:-**

भारतावर इंग्रज सत्तेचा अंमल होता. हा अंमल नेस्तानाभूत करण्यासाठी अनेक जाती जमातीतील लोक इंग्रजांना वेगवेगळ्या पद्धतीने विरोध करत होते. सर्वात आघाडीवर हे भटक्या विमुक्त समुदायातील लोक होते. त्यामुळे त्यांना इंग्रज हे कडवट शत्रू समजत होते. यांच्यावर कशा प्रकारे पाय बंद घालावा? यासाठी इंग्रजांनी एक कायदा केला. याला जन्मजात गुन्हेगारी कायदा म्हणतात. तो कायदा इंग्रजांविरोधात सक्षमपणे लढणाऱ्या भटक्या विमुक्त समुदायातील जमातींना लावण्यात आला. या कायद्यानुसार या समुदायात जन्मास येणाऱ्या प्रत्येक व्यक्ती ही जन्मत: गुन्हेगार म्हणून जन्मास येत होती. ही व्यवस्था अत्यंत अन्यायकारक स्वरूपाची होती. कोल्हापूर संस्थानांमध्ये छत्रपती शाहू महाराज यांनी राज्यकारभार हाती घेतल्यानंतर १८७१ चा गुन्हेगारी जमात कायदा आपल्या संस्थानांमध्ये लागू केला नाही. भटक्या विमुक्त समुदायातील लोक माणूस आहेत, त्यांना माणसांप्रमाणे वागणूक दिली पाहिजे हा पहिला धडा शाहू महाराजांनी घालून दिला.

**हजेरी प्रथा बंद:-**

भटक्या विमुक्त समुदायातील लोकांना जन्मजात गुन्हेगारी ठरवल्यामुळे त्यांना तारेच्या कुंपणात बंदिस्त करून ठेवले होते. दिवसातून तीन वेळा त्यांना हजेरी देणे बंधनकारक केलेले होते. ही हजेरी प्रथा म्हणजे अमानवी स्वरूपाची होती. छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात जन्मजात गुन्हेगारी कायदा बंद करून त्यांची हजेरी प्रथा देखील बंद केली. या समुदायाला मायेने जवळ घेतले.

**रजपूतवाडी पुनर्वसनाची प्रयोगशाळा:-**

छत्रपती शाहू महाराजांनी भटक्या मुक्त समुदायातील लोकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अनेक उपक्रम राबवले होते. वन्य, रानटी जीवन जगणाऱ्या फासेपारधी, रजपूत भामटा, डोंबारी, माकडवाले आधी भटक्या विमुक्तांना आपल्या संस्थांनात आणून त्यांच्यावर विविध प्रयोग केले जात असत. सोनतळी (रजपुतवाडी) हे शाहू महाराजांच्या प्रयोगाचे ठिकाण होते. या ठिकाणी शाहू महाराज या भटक्या विमुक्त लोकांवर वेगळे प्रयोग करत असत. त्यांना माणसात आणण्यासाठी सर्व प्रक्रिया करत असत. अशा पद्धतीने सोनतळी (रजपूतवाडी) हे भटक्या विमुक्त समुदायाची प्रयोगशाळा बनली होती.

**भटक्यांसाठी स्वतंत्र वसाहती:-**

भटक्या विमुक्त समुदायाला विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील करून घ्यायचे असेल तर, त्यांना रोजगार आणि राहण्यासाठी जागा देणे अत्यावश्यक आहे.हे शाहू महाराजांनी ओळखले होते.त्यानुसार आपल्या संस्थानांत या समुदायातील लोकांना रोजगार उपलब्ध करून दिला.त्यांना वेगवेगळ्या ठिकाणी नोकऱ्या दिल्या. त्यामुळे त्यांचा पोटापाण्याचा प्रश्न सुटला.शाहू महाराजांनी अश्या सर्व समुदायाला जमीन देऊन त्यांच्या वसाहती निर्माण केल्या. भटक्या विमुक्त समाजाच्या वसाहती कोल्हापूर मध्ये आज देखील पहावयास मिळत आहेत.

**भटक्या विमुक्त समुदायातील पैलवान:-**

शाहू महाराजांना कुस्तीची विशेष आवड होती. भटक्या विमुक्त समुदायातील मुले ही धिफाड ताकद असणारी होती. वडर समाजातील इराप्पा हा तरुण त्यांच्या नजरेस पडला.त्याचे पिळदार शरीर पाहून शाहू महाराजांनी त्यांना पैलवान करायचे ठरवले. पंजाब मधून पैलवान हे नेहमी कोल्हापूरला येत होते. हे पैलवान हत्तीसारखे दिसत होते. यावेळी शाहू महाराजांना इरापाची आठवण झाली. त्यांनी बोलवून घेतले. पंजाब मधील पैलवानांच्या सोबत कुस्ती धरण्यास सांगितले. आपल्या अचाट ताकदीने पंजाबच्या पैलवानाला इराप्पाने अस्मान दाखवले. शाहू महाराजांनी त्याच्या या कामगिरीवर खुश होऊन या समुदायाला दगडी काढायला खाणी दिल्या. अशा अनेक पैलवानांना त्यांनी आपल्या संस्थानात तयार केले होते.

**फासेपारध्यांची अंगरक्षक म्हणून नेमणूक:-**

पारध्यांवरील गुन्हेगारीचा कलंक धुवून काढण्यासाठी स्वतःचे राजे पद त्यांनी पणाला लावले होते. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात गुन्हेगारांसाठी हजेरी प्रथा बंद केली. त्यांना स्वतःचे अंगरक्षक म्हणून त्यांना नेमले. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा हा आदर्शवाद सोनेरी अक्षरात लिहिण्यासारखा आहे. हा राजा जन्मला राजवाड्यात पण राहिला धनगर वाड्यात. घिसाडी, गोसावी, डोंबारी, माकडवाले, फासेपारधी हे छत्रपती शाहू महाराज यांचे खरे सगेसोयरे होते.

**शिकारीसाठी या समुदायातील लोकांची मदत:-**

शाहू महाराज यांना शिकारीचा मोठा छंद होता. शिकारीसाठी शाहू महाराज आपल्यासोबत या भटक्या विमुक्त समुदायातील लोक घेत असत. हे लोक अत्यंत चपळ व धाडसी असल्याने हमखास शिकार होत असे. शाहू महाराजांना या लोकांविषयी प्रचंड विश्वास होता. त्यामुळे आपल्या सोबत नेहमी या समुदायातील लोक घेऊन शाहू महाराज शिकारीला जात असत.

**भटक्या विमुक्त समुदायातील लोकांचा प्रामाणिकपणा:-**

शाहू महाराजांनी फासेपारधी या जमातीचा प्रामाणिकपणा पाहून त्यांनी आपल्या राज्यात त्यांना रखवालदार म्हणून नोकरीस ठेवले. बाकीच्या भटक्या विमुक्तांना राधानगरी धरण बांधकाम मजूर म्हणून ठेवले. त्यांनी चोऱ्या करू नयेत, म्हणून त्यांना मुबलक असे धान्य पुरवण्यात येत होते. घर बांधणे, विहीर खोदणे इत्यादी कामावर भटक्या विमुक्ताना ते मजूर म्हणून ठेवत असत. यातून त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निकाली लागून ते सरळ मार्गे जीवन जगत. इतके महान कार्य छत्रपती शाहू राजांनी आपल्या राज्यात केले होते. एकदा शाहू महाराजांनी त्यांच्या प्रामाणिकपणाची परीक्षा घेण्याचे ठरवले होते. त्यांनी आपल्याला बंधुला सोनतळी कॅम्प वरती बोलवले होते. त्यावेळी त्यांनी रखवालदार म्हणून तिथे उभ्या असणाऱ्याना

सांगितले होते की, कोणीही आले तरी आत सोडायचे नाही. त्यांचा बंधू भेटावयास आल्यानंतर त्यांनी थेट आत जाऊ लागले. परंतु रखवालदारांनी काही केल्याने त्यांना आत सोडले नाही. त्यांचा बंधू मोठमोठ्याने त्यांच्याशी भांडू लागला, त्यांना त्यानी सांगितल मी शाहू महाराजांचा भाऊ आहे तरी देखील त्यांनी शाहू महाराजांचा आदेशानुसार त्यांना आत सोडले नाही. तुम्ही भाऊ असाल तर मग आम्हाला मारून आत जावा पण आम्ही राजांचा आदेश मोडणार नाही असे उत्तर दिले.यावेळी शाहू महाराज बाहेर आले आणि त्यांना आत घेऊन गेले.

**वडार समुदायातील लोकांच्या हाताला काम:-**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी भटक्या विमुक्त समुदायातील वडार समाजाला कर्नाटकामधून आणून त्यांना राजवाडा, शालिनी पॅलेस, रंकाळा तलाव, जुनी मंदिरे, राधानगरीतील लक्ष्मी बंधारा त्यांच्याकडून बांधून घेतला. या समाजाच्या हाताला काम दिले. एवढेच नाही तर, त्यांना कोल्हापूर संस्थानात कायमस्वरूपी स्थायिक होण्यासाठी आपल्या संस्थानातील जमिनी त्यांना दिलेल्या होत्या. आज हा समुदाय सायबर चौक परिसरात राहताना दिसून येतो.

**राजाराम महाराजांच्या लग्नासाठी भटक्या विमुक्त समुदायातील लोक विशेष निमंत्रित पाहुणे:-**

भटक्या विमुक्त समुदायातील लोकांना छत्रपती शाहू महाराज हे मायेने, ममतेने जवळ करत होते. आपल्या मुलाच्या म्हणजेच छत्रपती राजाराम महाराज यांच्या विवाहाच्या प्रसंगी विशेष निमंत्रित पाहुणे म्हणून कोल्हापूर राज्यातील सर्व भटक्या विमुक्त समुदायातील लोकांना स्वतंत्र रेल्वेने बडोदा या ठिकाणी आमंत्रित केले होते. हेच माझे सगे सोयरे आहेत म्हणून सर्वांना ओळख करून देत होते. असा मोठ्या दिलाचा राजा म्हणजेच छत्रपती शाहू महाराज होय.

**सारांश**

कोल्हापूर संस्थान हे भटक्या विमुक्त समुदायासाठी स्वर्ग होते. भटक्या मुक्त समुदायासाठी शाहू महाराजांनी केलेले कार्य हे अतुलनीय स्वरूपाचे आहे. एक कणवाळू राजा, मागासवर्गीयांच्या बद्दल हृदयात ममता असणारा राजा, सर्व जनता सुखात असली पाहिजे यासाठी अहोरात्र धडपडणारा राजा म्हणजे शाहू महाराज होय. सत्तेचा वापर प्रजेसाठी करणारा देशातील एक राजा म्हणून राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्याकडे पाहिले जाते. त्यांनी सत्तेचा वापर स्वतःसाठी न करता किंवा राजपदाचा वापर सोप्यांसाठी न करता प्रजेसाठी केला. एक राजा आपल्या फाटक्या तुटक्या लोकांना हृदयाशी कवटाळून तो आपल्याला जवळ घेतो. आपल्याशी बोलतो, आपल्या रोजगाराचा प्रश्न मिटवतो, हीच मोठी गोष्ट भटक्या विमुक्त समाजाच्या मनात घर करून राहिली. त्यामुळे इथल्या वंचित उपेक्षित भटक्या विमुक्त समाजाच्या दृष्टीने छत्रपती शाहू महाराज हे कुण्या एका देवा पेक्षा कमी नाहीत, अशी भावना सर्वच भटक्या विमुक्त उपेक्षित घटकांच्या मनात असल्याचे पहावयास मिळते.

**संदर्भ:-**

१) भोसले व्यंकप्पा,(२०२२), " राजर्षी शाहू महाराज आणि भटके विमुक्त", भटके व विमुक्त जमाती विचार मंच, कोल्हापूर.

२) साळुंखे नानासाहेब,(२०१६), "शाहूंच्या आठवणी," वृषाली प्रकाशन, कोल्हापूर.

३)जाधव रमेश,(२०१६), "राजर्षी शाहू गौरव ग्रंथ",महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग,महाराष्ट्र राज्य,मंत्रालय,मुंबई.

४) मोरे गिरीश,(२०१३), "राजर्षी शाहू विचार व कार्य",निर्मिती संवाद,कोल्हापूर.

5) https://hi wikipedia.org//Shahumaharaj// dated 29/10/2022,_09:32pm.